आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२ एप्रिल २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भाजपाला पुन्हा सत्ता मिळाली तर, भ्रष्टाचारविरोधी मोहिमेला गती दिली जाईल, अशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही
- राज्यात दुसऱ्या टप्प्यातल्या लोकसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग
- कर्नाटक, ओदिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, आंध्रप्रदेश आणि पुदुच्चेरी या राज्यांच्या काही भागांमधे येत्या ६ तारखेपर्यंत उष्णतेची लाट राहण्याची शक्यता

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत बंगळुरूमधे सुरु असलेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा निर्णय /लखनौ सुपर जायंट्सची दमदार सुरुवात

**<><><><><>**

भाजपाला पुन्हा सत्ता मिळाली तर, भ्रष्टाचारविरोधी मोहिमेला गती दिली जाईल. अशी ग्वाही प्रधानमंत्री आणि भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. ते आज उत्तराखंडमधे नैनीताल उधमसिंगनगर लोकसभा मतदारसंघात रुद्रपूर इथं प्रचारसभेत बोलत होते. तिसऱ्यांदा सत्ता मिळाली, तर भारताला जगातली तिसऱ्या क्रमाकांची आर्थिक महासत्ता बनवणार असल्याचा पुुनरुच्चार त्यांनी केला. उत्तराखंडच्या विकासाकरता केंद्र सरकारनं उचलेल्या पावलांची माहिती त्यांनी दिली. नागरिकत्व सुधारणा कायद्यान्वये भारताचं नागरिकत्व द्यायला विरोध करुन काँग्रेस राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पुढच्या आठवड्यात राज्यात भाजपाच्या प्रचारमोहिमेचं रणशिंग फुंकणार आहेत. येत्या १० एप्रिलला रामटेक इथं त्यांची जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर १४ एप्रिलला नागपूरमध्ये दीक्षाभूमी इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन ते चंद्रपूरला सभा घेणार आहेत. त्याव्यतिरिक्त भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या देखील सभा होणार आहेत. भाजपा नेते आमदार प्रवीण दरेकर यांनी आज मुंबईत भाजपा कार्यालयात आयोजित वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

भाजपाचे महाराष्ट्राचे प्रभारी डॉ. दिनेश शर्मा  यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र व्यवस्थापन समितीची आढावा बैठक आज झाली. निवडणूक प्रचाराची व्यूहरचना, प्रचार यंत्रणा त्याची अंमलबजावणी याबद्दल या आढावा बैठकीत सविस्तर चर्चा झाल्याचं  दरेकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपा कार्यकर्त्यांनी मतदारांपर्यंत पोचावं आणि विकसित भारत कार्यक्रमाविषयी त्यांना समजावून सांगावं असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी केलं आहे. ते आज कर्नाटकात बंगळुरु इथं पाच लोकसभा मतदारसंघांच्या शक्ती प्रमुखांना संबोधित करत होते.

कर्नाटकात २०१४ च्या निवडणुकीत भाजपाला ४३ टक्के मतं आणि १७ जागा मिळाल्या होत्या, तर २०१९ च्या निवडणुकीत ५१ टक्के मतं आणि २५ जागा मिळाल्या होत्या. यावेळी भाजपा-धर्मनिरपेक्ष जनता दल युतीनं सर्व २८ जागा जिंकाव्यात यादृष्टीनं काम करावं, असं आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केलं.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे वर्धा लोकसभा मतदार संघातले

उमेदवार अमर काळे यांनी आज अर्ज भरला. स्वाध्याय मंदिरापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत त्यांनी रॅली काढली. पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी या रॅलीपूर्वी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. परभणीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजय जाधव यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शिवसेनेचे बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार प्रतापराव जाधव यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. यावेळी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील उपस्थित होते. त्यांच्याशिवाय शेतकरी नेते रविकांत तुपकर, रेखा पोफळकर, प्रताप पाटील, असलम शहा हसन शहा, मोहंमद हसन इनामदार यांनीही बुलडाण्यातून उमेदवारी अर्ज दाखल केले.

नांदेड लोकसभा मतदारसंघात मंगळवारी सहा अर्ज दाखल झाले. त्यात भारतीय जनता पक्षाचे प्रतापराव पाटील-चिखलीकर यांच्यासह राष्ट्रीय किसान पार्टीचे विष्णू जाधव, जगदीश पोतरे, सुरज कदम, नागोराव वाघमारे, नय्यर जहाँ मोहम्मद फेरोज हुसेन या अपक्ष उमेदवारांनीही आज अर्ज भरले. नांदेड मतदारसंघात आतापर्यंत एकूण ११ अर्ज दाखल झाले आहेत.

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघासाठी आज एकूण ४ उमेदवारांनी ७ अर्ज दाखल केले. त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संजय देशमुख यांच्यासह अनिल राठोड, संदीप शिंदे, मनोज गेडाम यांनी अर्ज भरले. आतापर्यंत या मतदारसंघात एकूण ५ उमेदवारांनी अर्ज भरले असून ७५ जणांनी १३२ अर्ज घेतले आहेत.

हिंगोलीतून आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार नागेश पाटील अष्टीकर यांनी अर्ज भरला. त्यांच्याशिवाय वसंत पाईकराव, नामदेव

कल्याणकर, रवि शिंदे, देशा बंजारा यांनीही आज अर्ज भरले. यापूर्वी २ उमेदवारांनी अर्ज भरल्यानं या मतदारसंघातल्या एकूण अर्जांची संख्या ७ झाली आहे.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज १७ उमेदवारांचा समावेश असलेली आणखी एक यादी जाहीर केली. काँग्रेसनं माजी केंद्रीय मंत्री एम. एम. पल्लम राजू यांना आंध्र प्रदेशातल्या काकीनाडा लोकसभा मतदारसंघाची, आंध्र प्रदेशचे काँग्रेस अध्यक्ष वाय. एस. शर्मिला रेड्डी यांना कडपा लोकसभा मतदारसंघाची, तर काँग्रेसचे नेते जे. डी. सीलम यांना बापटला लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी दिली आहे. त्याव्यतिरिक्त काँग्रेसनं माजी केंद्रीय मंत्री तारिक अन्वर यांना बिहार मधल्या कटिहार लोकसभा मतदारसंघाची, तर अमीर चंद नायक यांना ओडिशातल्या कंधमाळ लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी दिली आहे.

<><><><><>

कर्नाटक, ओदिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, आंध्रप्रदेश आणि पुदुच्चेरी या राज्यांच्या काही भागांमधे येत्या ६ तारखेपर्यंत उष्णतेची लाट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तेलंगणा आणि कर्नाटकामधे पुढचे तीन दिवस, तर कर्नाटकची सागर किनारपट्टी, केरळ, तामिळनाडू, पुदुच्चेरी आणि आंध्रप्रदेश किनारपट्टीवर पुढचे पाच दिवस उष्ण आणि दमट हवामान कायम राहील, असा अंदाजही हवामान विभागानं व्यक्त केला आहे. येत्या ६ तारखेपर्यंत ईशान्य भारतात पाऊस आणि वादळांची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

पश्चिम हिमालय क्षेत्रात पुढचे पाच दिवस हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस आणि बर्फवृष्टीची शक्यता आहे, तर जम्मू-कश्मिर, लडाख, हिमाचलप्रदेश आणि उत्तराखंडमधे येत्या पाच तारखेपर्यंत वादळीवारे, ढगांचा गडगडाट आणि विजांचा

कडकडाट कायम राहील. वायव्य, मध्य आणि पश्चिम भारतात पुढच्या तीन दिवसात, तर तेलंगणा, कर्नाटक आणि आंध्रप्रदेशाच्या काही भागांमधे पुढच्या पाच दिवसात तापमानात २ ते ३ अंश सेल्सियसनं वाढ होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा लखनऊ सुपर जायंट्सच्या ८ षटकात १ बाद ६२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं आपल्यासाठी सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

FSSAI अर्थात अन्न  सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं ई कॉमर्स च्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्या खाद्य पदार्थ विक्रेत्यांना त्यांच्या उत्पादनांची योग्य ती वर्गवारी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दूध, तृणधान्य तसंच माल्टचा वापर

करून बनवण्यात आलेली काही उत्पादनं आरोग्य आणि शक्तिवर्धक पेय म्हणून विकली जात असल्याचं या प्राधिकरणानं म्हटलं आहे. या पेयांच्या  दिशाभूल करणाऱ्या वर्गवारीत तातडीनं सुधारणा करावी, अशी सूचना प्राधिकरणानं केली आहे.  त्या व्यतिरिक्त अन्न  सुरक्षा आणि मानक कायद्यामध्ये आरोग्यवर्धक पेय या शब्दाची व्याख्या किंवा मानक निश्चिती केली नसल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

ईशान्य सीमेवरच्या सध्याच्या परिस्थितीवर संघर्ष टाळूनच मार्ग काढता येईल, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या परिषदेत बोलत होते. सैन्य भक्कमपणे उभं असताना शांतीपूर्ण तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरुच राहील, असं ते म्हणाले. अपारंपरिक आणि अनियमित युद्ध हे भविष्यातल्या युद्धांचा भाग असतील, असं राजनाथ सिंग यांनी सांगितलं. त्यादृष्टीनं नागरी उद्योगांच्या सहयोगानं तंत्रज्ञान विकसित करण्याच्या लष्कराच्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ९ नक्षलवादी ठार झाले आहेत. केंद्रिय राखीव दल, कोबरा बटालियन आणि जिल्हा राखीव पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. बिजापूर जिल्ह्याच्या बस्तर विभागातील गंगापूर भागात ही कारवाई करण्यात आली. चकमकीनंतर पोलिसांना ९ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून एक हलकी मशीनगन, ग्रॅनेड लाँचर आणि इतर शस्त्र आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. या ठिकाणी शोधमोहिम सुरू आहे.

**//<><><><><>//**